# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**अत्यंत महत्वाचे** क्रमांक संगाबाअवि/३/संपमूम/२५८/२०२१
दिनांक : १६/०७/२०२१

प्रति,

प्राचार्य / विभागप्रमुख / मानद संचालक,
सर्व संलग्नीत संबंधीत महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदवी व पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग
मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा.

**विषय :- हिवाळी-२०२० परीक्षेमध्ये महाविद्यालयीन स्तरावर प्रथम ९ हा क्रमांक देवून Adding परीक्षा क्रमांक दिलेल्या प्रवेशित असलेल्या नियमित व माजी विद्यार्थ्यांचे दस्ताऐवज विद्यापीठात सादर करण्याबाबत.**

संदर्भ :- क्रमांक संगाबाअवि/३/संपमुमं/१६३/२०२१, दिनांक ३ जून, २०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, हिवाळी-२०२० परीक्षेकरीता आपल्या महाविद्यालयात नियमित व माजी प्रवेशित विद्यार्थ्यांचे परीक्षा क्रमांक पुरविण्यात आले होते. तथापि, विहित मुदतीत परीक्षा आवेदनपत्र व शुल्क भरुनही जर काही विद्यार्थ्यांचे परीक्षा क्रमांक सूचीमध्ये नांव समाविष्ट झाले नसेल, अशा विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत परीक्षा आवेदनपत्र भरले असल्याची खात्री महाविद्यालयाने त्यांचे स्तरावर करुन सदर विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन स्तरावर परीक्षा क्रमांक वितरित करावेत, व परीक्षा क्रमांक वितरित करतांना प्रत्येक परीक्षेकरीता प्रथम ९ हा क्रमांक देऊन त्यानंतर महाविद्यालय सांकेतांक व त्यानंतर अनुक्रमांक देण्यात यावा. असे संदर्भीय पत्रानुसार कळविण्यात आले होते.

ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून परीक्षा क्रमांक प्राप्त झाले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने उपरोक्तप्रमाणे Adding परीक्षा क्रमांक देवून परीक्षेला प्रवेशित करुन घेतले. अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे, पात्रता परीक्षेच्या गुणपत्रिकांच्या छायांकित प्रती, परीक्षा शुल्क विद्यापीठात सादर केल्याच्या पावत्या विद्यार्थ्यांचे गुण पाठवितेवेळी सादर करणे आवश्यक होते. परंतु सदर दस्ताऐवज विद्यापीठात सादर न केल्यामुळे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल जाहिर करता आले नाहीत.

आपणांस विनंती करण्यात येते की, अशा Adding परीक्षा क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचे खालीलप्रमाणे दस्ताऐवज सादर करावे.

१) **प्रथम ९ हा क्रमांक देवून Adding परीक्षा क्रमांक दिलेले माजी विद्यार्थी-**
परीक्षा क्रमांकासह परीक्षा आवेदनपत्र, मागील परीक्षेची गुणपत्रिका व शुल्क भरणा पावती

२) **प्रथम ९ हा क्रमांक देवून Adding परीक्षा क्रमांक दिलेले नियमित विद्यार्थी-**
परीक्षा क्रमांकासह परीक्षा आवेदनपत्र, व शुल्क भरणा पावती

तसेच ज्या परीक्षा मे.लर्निंग स्पायरल प्रा.लि. यांचेद्वारे पोर्टलच्या माध्यमातून संचालित केल्या जातात, अशा Adding परीक्षा क्रमांक दिलेल्या विद्यार्थ्यांचे यापूर्वी कोणत्याही सत्राचे ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र भरले असल्यास Login ID दिनांक १९ व २० जुलै, २०२१ रोजी क्रमांक संगाबाअवि/३/संपमूम/३५७/२०२१, दिनांक १३/०७/२०२१ या पत्रान्वये नियमित प्रवेशित विद्यार्थ्यांची संगणकीकृत यादी (Edit List) तपासून विद्यापीठात सादर करतेवेळी उपरोक्त दस्ताऐवज विद्यापीठात सादर करण्यात यावे. जेणेकरुन अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल विद्यापीठाला जाहिर करता येणे शक्य होईल.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन परीक्षा संचालनास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला,

(डॉ.हेमंत आर.देशमुख)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

198Narwade Sir